**L. A. BILL No. XLIX OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE CHIT FUNDS ACT, 1982, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९.**

**चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९८२ चा ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



एचबी-२२८०.–१.

सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ७० ची सुधारणा.

**२.** चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम ७० ला, त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि १९८२ चा ४०.

(क) असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मधील, "राज्य शासनाकडे" या मजकुरानंतर, "किंवा त्याबाबतीत राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिकार प्रदान करण्यात येईल अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(ख) असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) राज्य शासनास अथवा राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यास किंवा प्राधिकरणास, अपीलकाराला त्याचे अभिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर, अशा अपीलात, त्यास किंवा त्याला योग्य वाटेल असे आदेश पारित करता येतील आणि असे आदेश अंतिम असतील.

(३) अशा अधिका-याला किंवा प्राधिकरणाला अधिकार प्रदान करणा-या अधिसूचनेच्या अशा दिनांकास, राज्य शासनाकडे प्रलंबित असणारी सर्व अपिले, अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि जणू काही ती अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे दाखल करण्यात आली होती असे समजून, त्या अधिका-याकडून किंवा प्राधिकरणाकडून ती निकालात काढण्यात येतील.".

सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ७१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मधील, "राज्य शासनाने" या मजकुरानंतर, " किंवा राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याने किंवा प्राधिकरणाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९. ]**

**[ चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.